**पोलीस अधीक्षक,कार्यालय जालना**

**पोलीस शिपाई भरती - 2022-23**

पोलीस शिपाई भरती 2022-23 साठी मैदानी चाचणी दिनांक 19/06/2024 ते दिनांक 23/06/2024 पावेतो पोलीस मुख्यालय,जालना येथील पोलीस परेड ग्राऊंडवर घेण्यात आली होती. व सदर मैदानी चाचणी मध्ये प्राप्त गुणांची यादी मैदानी चाचणीच्या दिवशी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीमधील नमुद बाबी,जसे मैदानी चाचणीचे गुण,सामाजिक आरक्षण,समांतर आरक्षण, एनसीसी प्रमाणपत्र इ. बाबत उमेदवारास काही आक्षेप असल्यास तसे या कार्यालयास कळविणेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

नमुद कालावधीमध्ये एक ही आक्षेप प्राप्त न झाल्याने उपरोक्त नमुद यादीमधुन लेखी परिक्षेसाठी 1:10 प्रमाणे पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय यादी दिनांक 29/06/2024 रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती व सदर बाबतीत कांही आक्षेप असल्यास तसे दुरध्वनी/भ्रमणध्वनी वर कळविणे बाबत सुचना देण्यात आल्या होत्या.

दिनांक 01/07/2024 रोजी महीला उमेदवार चेस्ट नं.2112 कल्याणी दत्तू कोलते यांनी त्यांचे कडील एसईबीसी या प्रवर्गाचे प्रमाणपत्र दिनांक 19/06/2024 रोजी प्राप्त झालेले म्हणजेच दिनांक 15/04/2024 नंतरचे सादर केलेने त्यांचे प्रमाणपत्र अवैध ठरवून त्यांना खुल्या प्रवर्गात प्रवेश देण्यात आला होता व त्यांना मैदानी चाचणी मध्ये 32 गुण मिळाले होते, खुल्या प्रवर्गातील 33 गुण मिळालेल्या उमेदवारांना व एसईबीसी प्रवर्गातील 26 गुण मिळालेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात आल्याने सदर उमेदवार यांनी एसईबीसी चे प्रमाणपत्र मिळणे बाबत केलेला दावा हा दिनांक 15/04/2024 पूर्वीचा असल्याचे व त्यांनी दिनांक 07/04/2024 रोजीची दावा केल्या बाबतची पावती समक्ष हजर करुन त्यांना एसईबीसी प्रवर्गात पात्र करण्यात यावे असे निवेदन सादर केल्याने व त्यांनी सादर केलेली पावती ही दिनांक 15/04/2024 रोजी पुर्वीची असल्याने ती ग्राहय धरुन त्यांना त्यांना एसईबीसी प्रवर्गात समाविष्ठ करुन त्यांना दिनांक 07/07/2024 रोजी जे.ई.एस.कॉलेज, दुर्गामाता मंदीर रोड, जालना येथे होणा-या लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात आले आहे.

तरी महीला उमेदवार कल्याणी दत्तू कोलते चेस्ट क्रं.2112 यांनी दिनांक 29/06/2024 रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या पत्रकामधील सुचने प्रमाणे दिनांक 07/07/2024 रोजी सकाळी 07.00 वा.लेखी परिक्षेच्या ठिकाणी हजर रहावे.

(अजय कुमार बंसल)
पोलीस अधीक्षक,जालना